प्रकरण दुसरे

# बहिणाबाईंच्या कवितेतील सामाजिक आशय

## प्रकरण दुसरे

# बहिणाबाईंच्या कवितेतील सामाजिक आशय

### प्रस्तावना

ज्या काळात केशवसुत, विनायक, तांबे, गोविंदाग्रज हे मराठीमधील प्रतिभाशाली कवी काव्यलेखन करीत होते. त्याच काळामध्ये जळगावात एका शेतकऱ्याच्या घरात एक अशिक्षित स्त्री जात्यावर दळता दळता आणि शेतावर काम करता करता आपल्या बोली भाषेत संसाराची गाणी गात होती.

बहिणाबाईंच्या काळातील समाज आजच्या सारखा प्रगत नव्हता. समाजामध्ये अंधश्रद्धा कळसाला पोहचली होती. लोकांचा तांत्रिक-मांत्रिक फार विश्वास होता. सामाजिक विषमता, कर्मकाडं वाढलेली होती. त्यांनी आपल्या कवितेमधून बहुजन समाजाच्या स्थितीचे चित्रण केले आहे. त्यांच्या कवितेमधून प्रामुख्याने शेतकरी समाजाचं जीवन आलेले आहे. समाजातील लोकांची सुख दुःखे त्यांनी रेखाटलेली आहेत. सर्वसामान्य लोकांच्या सुखाने त्यांना आनंद होतो व त्यांच्या दुःखाने त्या कळवळून जातात. त्यांनी त्यावेळच्या समाजातील संस्कृतीची ओळखही आपल्या कवितेद्वारे करून दिली आहे. एकूणच त्यांच्या कवितेमधून एका ग्रामीण समाजाचे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते.

### बहिणाबाईंच्या काव्यातील सामाजिक जीवन

बहिणाबाईंच्या कवितेतील सामाजिक जीवन हे ग्रामीण स्वरुपाचे आहे. त्यांचा जन्म झाला ते ‘असोदं’ हे खेडेगाव आहे. त्याचप्रमाणे त्यांचे सासरही खेडेगावचं आणि आसपासचा परिसरही ग्रामीण असल्यामुळे साहजिकच त्यांच्या कवितेत ग्रामीण समाजाचे चित्र

दिसून येते. ज्या समाजातील सर्व घटकांचा शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. त्या परिसरात बहिणाबाईंच्या जीवनाची वाटचाल झाली असल्यामुळे त्यांच्या कवितेत शेतीविषयक, शेतकऱ्याच्या जीवनविषयक, त्यांच्या सुख-दु:खाच्या कविता आढळून येतात. शेती करणे, तिची मशागत, पेरणी, कापणी, उपननी हीच सर्व शेतकऱ्यांची दिनचर्या असे. त्यांनी या साऱ्यांच सूक्ष्म निरीक्षण केले आणि शेतात काम करत असताना, स्वयपाक करत असताना, स्वत:च्या अनुभवातून व निरीक्षणातून अशा अनेक गोष्टींना काव्यरुप दिले.

त्यांच्या कवितेतील चित्रण हे साधेसुधे आणि वास्तव जीवनाचे चित्रण आहे. त्यामध्ये खोटा डामडौल नाही की. खोटे सौंदर्य नाही. जसे आहे तसेच वास्तव असे चित्र आहे. बहुजन समाज, त्याची जीवन जगण्याची तऱ्हा, त्याच्या श्रद्धा, समजुती, जिव्हाळा, त्याचे सणवार या साऱ्या गोष्टी त्यांनी कवितेत रेखाटल्या आहेत.

समाजातील खरा घटक म्हणजे शेतकरी आणि शेतामधे राबणे हीच त्यांची रोजची दिनचर्या. शेतकरी आणि बैल यांचे असेच अतूट नाते असते. आज समाज प्रगत झाला आहे. तरीसुद्धा शेतकऱ्याला बैलाची आवश्यकता भासतेच. त्या काळामध्ये आजच्यासारखी आधुनिक यंत्रे नव्हती. शेतातील सर्व कामे बैलाच्या साहाय्यानेच केली जात होती. त्यामुळेच शेतकऱ्याचे आपल्या बैलावर खूप प्रेम असे. बैलाविषयी प्रेम, कौतुक व्यक्त करताना, 'गाडी जोडी' या कवितेत बहिणाबाई बैलाचे वर्णन करतात.

त्यांनी आपल्या लाल रंगाच्या बैलाचे आणि गाडीचे वर्णन केले आहे. त्या बैलाचे डौलदार खांदे आणि बांधे त्यांची चाल हरणासारखी आहे. बैलाची ताकद साखळदंडासारखी आहे. अशाप्रकारे त्यांनी बैलाचे वर्णन केले आहे. मृग नक्षत्र आले की शेतकरी चातक पक्षाप्रमाणे पाऊसाची वाट पाहत असतो. एकदा पाऊस आला की 'पेरणी'ला सुरुवात होते.

'पेरणी' झाल्यानंतर हळूहळू शेतामधील इतर कामाला सुरुवात होते. ग्रामीण समाजातील सर्व घटकांची लगबग सुरु होते. त्यांनी आपल्या कवितेत म्हटले आहे. 'पेरणी' ही जगाच्या कल्याणासाठी होते. त्यामुळे कितीतरी प्रश्न सुटतात. एक म्हणजे गुरांच्या चाऱ्यांचा प्रश्न सुटतो आणि महत्त्वाचे म्हणजे कोटी, कोटी, लोकांच्या अन्नाचा प्रश्न सुटतो. हा शेतकरी जगाचे कल्याण करतो असेच त्यांना या ठिकाणी सूचित करायचे आहे.

'पेरणी' झाल्यानंतर बी उगवते, फोफावते, त्याला पिक येते व नंतर ते कापणीला आल्याचे बहिणाबाई पुढीलप्रमाणे सांगतात. ऊनाचा तडाखा वाढलेला असतो. अशावेळी पिके पूर्णपणे तयार झालेली असतात आणि शेतकरी त्यावरून अंदाज करतात की जमिनीला आता तडे पडायला लागले आहेत. तेंव्हा आता कापणी आली आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्याच्या डोळ्यापुढे धान्याची मापणी दिसू लागते. सर्वानांच कापनीचे वेध लागलेले असतात. सगळेजण आपआपली कापणी आवरुन घेतात. कारण कापणी झाली म्हणजे सर्व काही झाले असे नाही. त्यानंतरही रगडणी असते. खेडेगावातील समाजजीवन हे पूर्णपणे कृषीजीवनच असते. त्यांचा दिवस सुरु होतो, तोच शेतातील कामापासून. त्यामुळे बहिणाबाईंच्या कवितेत हे शेतकरी जीवनच पहावयास मिळते. कापणी होते, त्यानंतर मळणीही केली जाते. नंतर धान्याची मापणी सुरु होते. ग्रामीण भागात आजही 'सुगीच्या' दिवसामध्ये तुम्हाला गावामध्ये कोणी दिसणार नाही. सर्वजण आपापल्या कामाच्या व्यापामध्ये असतात. मळणी आणि उपनणीसाठी आजच्यासारखी यंत्रे त्यावेळी अस्तित्त्वात नव्हती. मळणीसाठी 'खळे' तयार करावे लागतं असे. आजही खेड्यात काही ठिकाणी ही खळी दिसतात आणि 'उपननी'साठी सर्वस्वी वाऱ्यावर अवलंबून रहावे लागे. परंतु वाऱ्याचा काय भरवसा. केंव्हाही येतो आणि कधीही जातो. त्यामुळे सर्व शेतकरी त्याची आतुरतेने वाट

पाहत असायचे. एखादा वारा सुरु झाला की 'उपननी' करून घ्यायची असा त्यांचा विचार असायचा. पण वारा यायचा नाही तेव्हा त्याला म्हणतात,

"देवा माझी उपपनी
तुझ्या पायी इनवनी
दैवा, तुझी सोपवनी
माझ्या जीवाची कारोनी"[१]

त्यांनी आपल्या कवितेत समाजामध्ये स्त्रीचे असलेले स्थान याबद्दलही अप्रत्यक्ष रेखाटन केले आहे. स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान दिले जायचे. पूर्वी मुलींचे लग्न झाल्यावर मुलगी सासरी गेल्यानंतर तिनेच सर्व कामे करावी म्हणून तिला सासुरवास केला जायचा. पण तिने त्याला कधी प्रतिकार केला नाही. त्यांच्या कवितेमधील स्त्री, पहाटे उठून दळण करणारी, पाणी आणणारी आहे. त्यांनी त्या स्त्रीला गोठ्यातील जनावराची उपमा दिली आहे. कारण तिचे जीवन हे गोठ्यातल्या जनावरासारखचं होते. अशाप्रकारे स्त्रीचे तत्कालिन समाजातील स्थान कसे होते याचा उल्लेख त्यांनी केला आहे.

बहिणाबाई एक अडाणी स्त्री. पण त्यांनी बुद्धीवादी लोकांना स्तिमित करून टाकतील असे तत्त्वज्ञान सांगितले आहे. परिस्थितीपुढे माणूस नेहमीच झुकतो असं म्हंटलं जातं. पण परिस्थितीपुढे न झुकता जो आपले नियोजित ध्येय गाठतो तो इतरांच्यासाठी एक आदर्श बनतो. बहिणाबाईंचे काव्यही असेच आहे. त्यांना अकाली वैधव्य प्राप्त झाले. परंतु एवढी बिकट परिस्थिती असताना देखील त्या डगमगल्या नाहीत. आलेल्या प्रसंगाला धैर्याने सामोऱ्या गेल्या. मोठ्या हिंमतीने त्या जीवनात उभ्या राहिल्या. त्याना जे अनुभव, काही बिकट प्रसंग आले त्यांचेच चित्रण त्यांच्या काव्यात आले आहे. त्यावेळचा समाज आणि आजचा समाज यामध्ये कितीतरी अंतर आहे.

## बहिणाबाईंच्या काव्यातील अनुभवसंचित

बहिणाबाईंनी जीवनात जे जे अनुभवले आणि भोगले ते त्यांनी काव्यात रेखाटले. त्यांच्या जीवनातील साऱ्याच भल्याबुऱ्या अनुभूती काव्यात प्रकट झाल्या आहेत. पहाट फुटली की पक्ष्यांच्या किलबिलाटास सुरुवात होते. त्याचप्रमाणे त्यांची कविता सहजमधूर बाहेर येत असे. त्यांच्या कवितेत शब्दाशब्दांतून अनुभव डोकावतो. दैनंदिन जीवनाची वाटचाल करताना, पावलोपावली बसणाऱ्या चटक्यांचा दाह सहन करत आणि त्यातूनच अनुभव व्यक्त करीत त्याची कविता रचली गेली.

बहिणाबाईंचा प्रत्येक अनुभव वाचकाला काही ना काही तरी सांगून जातो. पूर्वीच्या काळी बहुतांशी शेती ही पावसावर अवलंबून असायची. पण काही ठिकाणी मात्र विहिरी असत. शेतात विहीर असेल तर शेतकरी बागाईत करे. त्यावेळी आजच्यासारखे विजेचे पंप नव्हते. विहिरीतून पाणी काढण्यासाठी मोटेचा वापर केला जात असे. पिकाना पाणी देणे हा शेतकऱ्याचा दिनक्रमच. त्यांचे हे पाणी देणे 'मोट हाकलते एक' या कवितेमधून समर्थपणे रेखाटले आहे.

बहिणाबाईंची कल्पनाशक्ती अचाट होती. त्या आपल्याला जाता-जाता किती सहजपणे उपदेश करतात. आजूबाजूच्या परिसरात, मानवी जीवनात काय चालले आहे याचा त्या सहजतेने शोध घेतात. त्यासाठी रोजच्या दैनंदिन व्यवहारातील त्या उपमा देतात. शेताच्या बांधावर बोरी-बाभळीची झाडे असतात. आपण कधी शेतावर गेलो तर बोरे काढणे आणि खाणे, याच्यापलीकडे आपल्या मनात कसलाही विचार येत नाही. मात्र बहिणाबाई मात्र बोरी बाभळीच्या अंगावर काटे का असावेत हे तत्वज्ञान आपल्याला उलगडून सांगतात. अवघ्या चारचं ओळीमधून त्यांनी मानवी जीवनावर त्याच्या जीवनातील वास्तवतेवर प्रकाश

टाकला आहे. मनुष्य प्राणी जीवन जगत असताना त्याला अनेक गोष्टीची गरज भासते. त्यामुळे तो एकमेकांच्या साहाय्याने आपली कामे करीत असतो. त्याची वागण्याची पद्धत, त्याची प्रवृत्ती याचा अचूक वेध बहिणाबाईंनी घेतला आहे.

> ''पाहीसनी रे लोकाचे
> यवहार खोटे नाटे
> तव्हा बोरी बाभयीच्या
> आले आंगावर काटे''[२]

माणसे व्यवहार करताना एवढा खोटेनाटेपणा करतात की ते पाहून झाडाझुडपाच्या (बोरी-बाभयीच्या) अंगावर देखील शहारे यावेत. या ठिकाणी त्यांनी माणसांच्या खोट्यानाट्या व्यवहाराची व्यापकता किती आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे समाजातील वास्तवतेचे चित्रण त्यांनी याठिकाणी केले आहे. 'माझ्या जीवा' ह्या कवितेमधून त्यांनी मौलिक मागदर्शन केले आहे. माणसाचं जीवन आणि मरण हे ईश्वराच्या हातात आहे. आपला दिवस हा कामामध्ये जातो व रात्र ही झोपण्यामध्ये जाते. असे हे आपले जीवन आहे. जीवन आणि मरणाच हे चक्र सतत फिरत असते आणि त्यामध्ये फक्त एका श्वासाचे अंतर आहे. म्हणून त्या म्हणतात, माणसाने स्वार्थी जीवन जगू नये. म्हणूनच त्या जीवाला सांगतात, जे कोणी दु:खाने पिडीत असतील, जे कोणी त्रासाने कण्हतं असतील, त्यांचे दु:ख दूर करण्याचा प्रयत्न कर आणि जीवनात जे दुर्मुखलेले आहेत अशा लोकांना वठणीवर आण, असे त्या आपल्या जीवाला सांगतात आणि हे सर्व सांगितल्यानंतर त्या मानवाला म्हणतात, हे जीवन तुम्ही आनंदानं जगा. जीवनातील मौज लुटा. जीवन जगताना संकटे येतील पण तुम्ही त्याच्यावर मात करा. हे जीवन तुम्ही उंच आभाळसारखं आणि

धरतीच्या मोलाचे जगा. बहिणाबाईंनी याठिकाणी जीवनविषयक उच्च विचाराचे प्रकटीकरण केले आहे. त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन किती विशाल होता हे दिसून येते.

त्याचप्रमाणे त्या माणसाला परोपकारी जीवन जगण्याचा संदेश देतात. माणसाला परमेश्वराने हृदयाची देणगी दिली आहे ती केवळ पोटासाठी नाही, तर काही तरी चांगले करण्यासाठी. कारण हा देह नश्वर आहे. तो या जगातून निघून जातो. हे माणसा तू जर या जगामध्ये काही चांगले काम केले असशील तर तुझे पाठीमागे नांव निघेल. तुझ्या मृत्यूनंतरही लोक तुला विसरू शकणार नाहीत. म्हणून, माणसा तू सदैव आपल्या स्वत:च्या स्वार्थीपणाच्या पाठीमागे लागू नकोस. दुसऱ्यासाठी काहीतरी कर, असे त्या सांगतात. समाजामध्ये विशेषत: ग्रामीण समाजामध्ये लोकांना एकमेकांचे चांगले झालेले पाहावत नाही. माझे चांगले आहे. तर दुसऱ्याचेही चांगले असावे असा त्यांचा स्वभाव नसतो. समाजामध्ये अशा प्रवृत्तीचे लोक अनेक ठिकाणी पहावयास मिळतात. त्यांनी या ठिकाणी अशा अपप्रवृत्तीच्या लोकांना या ठिकाणी उपदेश केला आहे. त्यांच्या काव्यातील परिसर हा ग्रामीण आहे. त्यामुळे त्या ठिकाणचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे आणि शेतीच्या व्यवसायाला जोडधंदा म्हणून दुधाचा व्यवसाय केला जायचा. गाई-म्हैशीवरून शेजारी-पाजारी यांच्यात अनेक वेळा धुसफुस होत असते. हाच अनुभव बहिणाबाईंनी खालील ओळीमध्ये प्रकट केला आहे.

"तुझी म्हईस ठांगय
नको रुसू लतखोऱ्या
माझी म्हईस दुभती
नको हुसू रे शेजाऱ्या"[३]

आपली म्हैस भाकड आहे, दुभती नाही म्हणून रागावण्याच आणि रुसण्याच काहीच कारण नाही. पण दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना ते सहन होत नाही. आपली म्हैस दुभती आहे म्हणून शेजाऱ्याने आपला हेवा करू नये असंही त्या या ठिकाणी सांगतात. या ठिकाणी त्यांनी माणसांच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. बहिणाबाईंची निरीक्षण शक्ती किती सूक्ष्म आहे हे आपल्याला दिसून येते. माणूस आपलं काम करून घेण्यासाठी, दुसऱ्याचा वापर करतो. हे बहिणाबाईंनी म्हणीच्या माध्यमातून सांगितले आहे.

''तवा खातो भाकर, चुल्हा भुकेला
पव्हरा पेतो पानी, रहाट तान्हेला''[४]

तवा भाकरी खातो. पण चुल मात्र उपाशीच राहते. त्याचप्रमाणे पोहरा हा पाण्यापर्यंत पोहचतो आणि पाणी पितो पण रहाटाला मात्र त्याचा काहीच उपयोग होत नाही. याप्रमाणेच समाजातील काही स्वार्थी लोक, आपल्या फायद्यासाठी दुसऱ्यांचा उपयोग करतात आणि आपला स्वार्थ साधून घेतात. अशी माणसे समाजामध्ये असतात. याचेच बहिणाबाईंनी निरीक्षण केले आणि म्हणीच्या माध्यमातून रेखाटले.

बहिणाबाईंची कविता ही अनुभूतीतून जन्माला आलेली कविता आहे. ''पुस्तकी पांडित्यामधून किंवा केवळ वाङ्मयीन संस्कारामधून येणाऱ्या पढीक व तात्विक विद्वत्तेपेक्षा, अर्थपूर्ण व अनुभवाच्या जगण्यामधून लाभलेल्या बहिणाबाईंच्या या अंगभूत व चिंतनशील शहाणपणाची प्रकृती मूलतःच अगदी वेगळी आहे.''[५] त्यांच्या कवितेमधून आपल्याला अनुभवाचे शहाणपण दिसून येते.

**काही सामाजिक परंपरा :**

बहिणाबाईंनी आपल्या काव्यात, खानदेशचा परिसर, त्या ठिकाणच्या धार्मिक परंपरा, समाजातील सण, उत्सव इ.चे वर्णन केले आहे. त्यांनी 'गुढी उभारनी', 'आखजी', 'पोया' या कवितांमधून भारतीय संस्कृती चित्रीत केली आहे. सण, परंपरा जतन करीत असताना त्यांनी त्यामधूनही माणसाला काही महत्वाचे उपदेश केले आहेत.

'गुढीपाडवा' हाही शेतकऱ्यांचाच एक सण. या सणाने नव्या वर्षाची सुरुवात होते. घरेदारे या निमित्ताने स्वच्छ केली जातात. सगळीकडे कसे प्रसन्न वातावरण असते. प्रत्येकजण आपआपल्या कामात दंग असतो. आपले मन प्रसन्न ठेवून येणाऱ्या सणाचे सगळेजण स्वागत करतात. आता नवीन वर्षाचा गुढी पाडवा आला. तेव्हा तुम्ही मागच्या वर्षीचा राग द्वेष संपवून एकमेकांवर लोभ वाढवा. पाढव्यादिवशी कुणीही भांडण करू नका. सर्वांनी एकमेकांशी प्रेमाने वागा. हाच संदेश बहिणाबाई देतात.

त्या साऱ्यांना सांगतात, अरे उठा, राधा महारीण तुमचं अंगण झाडून गेली आहे. तुम्ही सणाची तयारी करायची सोडून असे आळसामध्ये का बसला आहात. कारण हा हा म्हणता रामप्रहर निघून जाईल. चैत्राचे ऊन असल्यामुळे घरदार साफ करताना तुमचा जीव कासावीस होणार तरीही हे कष्ट विसरून प्रसन्न रहा. पुढे बहिणाबाई स्पष्ट करतात की, आपण गुढी उभारतो. पण लोक त्याला गुढी पाडवा का म्हणतात, परंपरेने चालत आले म्हणून सर्वजण तेच म्हणतात. पण त्या सांगतात, त्याला 'गुढी उभारणी' असे म्हणा. कारण काठी आपण उभारत असतो पाडत नसतो. म्हणून तुम्ही सुधारणा करा आणि 'गुढी उभारणी' असे म्हणा. एका धार्मिक सणाच्या माध्यमातून त्यांनी मानवाला किती

मौलीक उपदेश केला आहे. लोकांना मनातली अढी काढावयास त्या सांगतात. आजच्या सामाजिक स्थितीत त्यांचा उपदेश किती महत्त्वाचा आहे हे आपणास दिसून येते.

त्यांच्या कवितेमधील दुसरा सण म्हणजे अक्षयतृतीया. हा सणही शेतकऱ्यांच्या जीवनाशी अप्रत्यक्षरित्या संबंधित आहे. शेतीची सर्व कामे संपली म्हणजे हा सण येतो. हा सण विशेषत: स्त्रियांचा असतो. या सणाचे वर्णन करताना त्यांचे स्त्रीमन हरकून जाते. आखजी म्हणताच त्यांना निंबाच्या झाडावरच्या झोक्याची आठवण होते. वाऱ्याच्या झोताबरोबर हेलकावे खाणारा झोका, वारा कसा असतो तर भिरभिरी असतो याचेही वर्णन त्या करतात. इकडून तिकडे जाणारा झोका पाहून त्या म्हणतात या झोक्याची तऱ्हाच वेगळी आहे. गेला गेला म्हणत तो माहेरला पोहचतो व आला आला म्हणत सासरला येतो. त्यांनी सासर आणि माहेरबद्दल असलेल्या भावना किती सहज, साध्या शब्दात वर्णन केल्या आहेत. झोका खेळत असताना जीवाची भूक संपते, येणाऱ्या वाऱ्याने त्यांचं पोट भरत. वाऱ्याने हलणाऱ्या झाडाच्या फांदीवरती त्यांचे लक्ष असते. नंतर त्या सणांसाठी, पोरीसोरी जे खेळ खेळतात त्याचे वर्णन करतात, फुगड्या, पिंगा असे खेळ रंगात आलेले असतात. पोरींचा नुसता धांगडधिंगा सुरु असतो. प्रत्येकांच्या दारोदारी खेळण्याची एकच घाई झालेली दिसून येते. घरोघरी 'गवराई' मांडल्या जातात. त्यांची सजावट केली जाते. त्यांच्या पुढे टिपऱ्या खेळल्या जातात. त्यांनी या खेळाचं वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

> ''किती खेय किती खेय
> सांगू मी काय काय जी
> खेयीसनी खेयीसनी
> आंबले हातपाय जी !''[६]

इतरवेळी काम केल्यानंतर आपल्याला कष्ट जाणवतात, खेळल्यानंतर हातपाय आंबले आहेत पण मन मात्र प्रसन्न आहे त्यामुळे थकवा जाणवत नाही. चैत्रानंतर, वैशाख महिना येतो. यावेळी सर्व जमिनीची मशागत केली जाते. म्हणूनच त्या म्हणतात, चार दिवसांच्या विश्रांतीनंतर पुढे शेतीच्या मशागतीसाठी तयार रहा. त्यानंतर पुढच्या वर्षी 'आखजी' कधी येणार असं एकमेकांना विचारतच ही आखजी संपून जाते.

शेतकऱ्याच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा सण 'पोया' म्हणजेच पोळा. खऱ्या अर्थाने हा बैलाचा सण. या दिवशी बैलांना पुजल जातं. त्यांना नैवैद्य दिला जातो. बैलाविषयी श्रद्धेची, कृतज्ञतेची भावना व्यक्त केली जाते. या दिवशी बैलांना विश्रांती दिली जाते. त्यांना सजवून पोटभर जेवू घातले जाते. हौसेने त्यांची मिरवणूक काढली जाते. म्हणूनच हा बैलांचा सण म्हणावा असे बहिणाबाई म्हणतात, 'बैला खरा तुझा सण' शेतकऱ्यांसाठी बैलाचं ऋण फेडण्याचा हा सण. पोळ्याचा सण आल्यानंतर शेतकऱ्यांना त्या सांगतात तुमचे घरदार सजवा, बैलांना शेंदूर घोटा, त्यांना आंघोळ घाला. गळ्यामध्ये घुंगरू घालून त्यांची मिरवणूक काढा. या दिवशी बैलांना सजवून झाल्यानंतरच घरातील स्त्रियांना त्यांच्या इतर कामाची आठवण होते. बैलांसाठी पुरणपोळीचा नैवेद्य केला जातो. बैलांच्या वर्षभराच्या कष्टाची जाणीव यावेळी होते. शेतात नांगर, वरवर ओढणाऱ्या बैलाच्या कष्टाला सीमाच नसते. शेतकऱ्यांच्या साथीने सर्व कामे बैलं करत असतात. शेतातले पीक त्याच्या हाती येते ते या बैलांच्या जीवावरच. म्हणूनच त्या म्हणतात,

''पीक शेतकऱ्या हाती
याच्या जीवावर शेती ''[७]

म्हणूनच त्या दिवशी त्याला पोटभर जेवू घाला. त्यांच्या शिंगाला बाशिंगाच ओझ बांधू नका. काही ठिकाणी या सजवलेल्या बैलांच्या शर्यती लावल्या जातात. आपली हौस होते परंतु या मुक्या प्राण्यांना त्रास होतो. त्यांना होणारा त्रास कोणी विचारात घेत नाही. त्यांच्याविषयी उपकाराची जाणीव ठेवण्याऐवजी त्याला कृतघ्नतेने वागवीले जाते. बहिणाबाईच्या या कवितेमधून आपल्याला मुक्या प्राण्यांविषायीची कणव व त्या काळातील संस्कृतीची ओळख होते.

'पांडुरंग' हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहे. आषाढी आणि कार्तिकी अशा वर्षातून दोन पांडुरंगाच्या दिंड्या पंढरीला काढल्या जातात. त्यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक या दिंडीमध्ये सहभागी होऊन पंढरपूरला जातात. बहिणाबाईची 'आली पंढरीची दिंडी' ही कविताही भक्तीपूर्ण कविता आहे. बहिणाबाईंची विठ्ठलावर फार भक्ती होती. कारण तो सर्वसामान्यांचा गोर-गरिबांचा देव आहे. पंढरीची दिंडी जळगावात येताच त्यांना खूप आनंद होई. कामामुळे संसारातील व्यापामुळे त्यांना पंढरीला जाता येत नसे. पर्यायाने पांडुरंगाचेही दर्शन त्यांना घेता येत नसे. म्हणून निदान दिंडीमधून आलेल्या वारकऱ्यांचे तरी दर्शन घ्यावे यासाठी त्या दिंडीशी भक्तीभावाने एकरूप होतात. जळगावात आलेल्या दिंडीचे वर्णन त्या आपल्या काव्यामधून करतात.

जेव्हा दिंडी जळगावात येते. तेव्हा भोळे भक्त आपल्या दारात उभे राहून दिंडीचे दर्शन घेतात. आणि पाखंडी लोक पसार होतात. टाळमृदुंगांच्या गजरात बुक्का, गुलाल, लाहया यांची उधळण करीत काही वारकरी पुढे असतात. तर काही पाठीमागे, पालखीच्या आणि दोन्ही बाजूलाही वारकरी असतात आणि पालखीबरोबर आप्पा महाराज असतात. अशी ही दिंडी जळगावात येते. ऊन, वारा, थंडी यांची कसलीही पर्वा न करता निघालेले वारकरी त्यांचे बहिणाबाईना कौतुक वाटते. जळगावचे आदरस्थान असलेले 'अप्पामहाराज'

हे या दींडीबरोबर आहेत. तेंव्हा आपणही त्यांचे दर्शन घेवू या, प्रसाद घेवू या, बुक्का लावू या. आपल्याला पंढरपुरला जाता येत नाही. किमान आपण त्या वारकऱ्यांचे, पालखीचे दर्शन घेवू या. असे बहिणाबाई म्हणतात. इतरांनाही त्या तुम्ही एवढं तरी करा. संसारात दुसरं काय आहे? म्हणून त्या बसलेल्यांना सांगतात, काय तुम्ही घरात पाय मोडून बसला आहात, पंढरीची वारी आली आहे, चला तिकडे जावू या असे म्हणतात व तितक्याच भक्तिभावाने त्या विठ्ठल मंदिराचेही वर्णन करतात. हे विठ्ठल मंदिर म्हणजे साऱ्याचं माहेर आहे. या मंदिरात टाळ मृदुंगाचा गजर सुरू असतो. भक्तगण भक्तीभावाने, मंत्रमुग्ध होवून भजन करत असतात. बहिणाबाई या भजन करणाऱ्यांला सल्ला देतात. मन शुध्द ठेवून भजन करा. कितीही कष्ट करून थकला असला तरीही, देवाचे नाव घेवून टाळया पिटा. पांडुरंगाच्या नावाने भक्तीचा झेंडा फडकवा. भजन, आरती, भाळ टेकून वंदन करून झाले तरीही बहिणाबाई काही क्षण विठ्ठलाच्या दारात उभ्या राहतात.

त्याचप्रमाणे त्यांनी जळगाव परिसरात असणाऱ्या 'आदिमाया' या देवीचे चित्रणही आपल्या कवितेत केले आहे. या आदिमायेचे रूप विराट आहे. तिला बारा गाडया काजळ, सात समुद्राचं नहाण्यासाठी पाणी, धरतीवरलं सोनं-चांदी, आकाशाचे चोयी लुगडं, तेही कमी पडते, अशी ही आदिमाया आहे. इडापीडा टाळणारी, ब्रम्हा, विष्णू, रूद्र बाळांना खेळवणारी आहे. तिच्या विशालतेचे चित्र त्यांनी आपल्या कवितेमधे रेखाटले आहे. अशाप्रकारे त्यांनी आपल्या सभोवतालच्या प्रदेशातील, समाजातील रूढी, धार्मिक परंपरा, सण, उत्सव, इ. चे कवितेमध्ये केले आहे. समाजातील धार्मिक परंपरा, संस्कृती जोपसताना लोकांना मौलिक उपदेशही केले आहेत.

## सामाजिक विचारांचा पुरस्कार

बहिणाबाईंनी आपल्या कवितेमधून समाजाला तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ''आपण स्वर्गाचा विचार करतो पण शेजाऱ्यांचा नाही. टोलेजंग इमारतीचे सौंदर्य आपल्या मनाला सुखावते पण पायथ्याशी असणाऱ्या झोपडीतील कारूण्य आपल्या काळजाला भिडत नाही. पाटी उचलणाऱ्या माणसांचे चित्र लोभसवाणे वाटते पण मातीत राबलेले त्याचे हात आपल्या बरोबर पंक्तित बसून दोन घास खावेत असे वाटत नाही.''[८] कारण समाजातील प्रत्येकजण स्वार्थी बनलेला आहे. आपण म्हणण्यापेक्षा मी स्वत: असा आपला विचार आहे. आपण स्वत:शिवाय दुसऱ्याचा विचार करत नाही. माणूस हा मतलबी आणि स्वार्थी आहे. माणसापेक्षा गोठयातले जनावर बरे. असे बहिणाबाई म्हणतात. माणूस हा माणुसकीला पारखा झाला आहे. केवळ लोभासाठी तो कुणाचाही घात करू शकतो. तो आपले माणूसपण हरवून बसला आहे. हा 'माणसासारखा' कधी वागेल अशी खंत त्या आपल्या कवितेत व्यक्त करतात.

त्यांची 'रायरंग ' ही कविता समाजातील सत्य परिस्थितीवर प्रकाश टाकणारी, लोकांना विचार करायला लावणारी आहे. 'रायरंग' म्हणजे 'बहुरूपी'. पण लोक त्याला भिकारी म्हणतात. पण त्याला भिकारी म्हणू नका असे बहिणाबाई सांगतात. हा बहुरूपी आपले पोट भरण्यासाठी सोंग घेतो. हे सर्व फक्त तो पोटासाठी करतो. तुमचे श्रम हसवून कमी करतो आणि हसवता हसवता तो लोकांना उपदेश करून जातो.

"आला आला रायरंग

करे लोकाचं रंजन

हासवता हासवता

घाले डोयात अंजन"[९]

काव्याची रचना किती सोपी आहे तरीही त्यातून किती गहन विचार बहिणाबाईनी आपल्याला सांगितले आहेत. जीवन म्हणजे बहुरूप्याचाच खेळ आहे. प्रत्येक वेळी आपण देखील वेगवेगळी सोंगे करीत असतो. असेच त्यांनी या ठिकाणी सुचविले आहे.

'वाटच्या वाटसरा' ही कविता देखील जीवनाच्या वाटेवर चालणाऱ्या वाटसरूला उद्देशून लिहिलेली आहे. त्या वाटसरूला त्या सांगतात, जीवनाची ही वाट मोठी बिकट आहे. तुझ्या वाटेमध्ये सागर-गोटे आहेत. तुला चालताना ठेच लागेल. डोळयात पाणी येईल, पायाला फोड येतील, परंतु तूला जायलाच पाहिजे. म्हणजे जीवन कितीही खडतर असले तरी त्या जीवनपथावरून तुला गेलेच पाहिजे. आणि आता तर वेळ अपूर्ण आहे. या उतार-चढनीच्या प्रवासात सुख-दु:खे येणार, पण या सुख-दु:खातच रमत-गमत जीवनाचा प्रवास कर, म्हणजे तुझा प्रवास सुखकारक होईल. जीवनात कितीही संकटे आली तरी न डगमगता या जीवनाच्या वाटेवर चालत रहा. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी, आलेल्या प्रसंगाला मोठया-धीरान तोंड दयायला शिका असे त्या सांगतात. वाईट कर्माची फळं नेहमीच कडू असतात किंवा वाईट कर्म केल्यानंतर त्याची सजा त्याला मिळतेच. बहिणाबाईनी आपल्या साध्या-सोप्या गोष्टींमधून, जीवनात येणाऱ्या अनुभवांतून समाजाला विचारांची शिकवण दिली आहे.

## सामाजिक विषमता

आज समाज प्रगत झालेला आहे. परंतु समाजातील सामाजिक विषमतेची दरी अजून संपलेली नाही. बहिणाबाईची 'घरापासून मळ्याकडे ' ही कविता समाजातील विषमता दर्शविणारी आहे. घरापासून मळ्याकडे जात असताना त्यांचा प्रवास आजूबाजूच्या समाजाचे निरिक्षण करीत होत असे. त्यांच्या डोळस निरीक्षणांतून जीवनाचे तत्त्वज्ञान साकारले आहे. हे या ठिकाणी दिसून येते.

" देखा महारवाडयात
नावाचेच घरदारं
भटकती गावामधी
चाले तोंडांन जोहार "[१०]

महारांना महारवाडयात घरे कुठे असतात. "ते नुसते नावाचेच घर. घरदार नसणारे महार तोंडाने 'जोहार' म्हणतं. मात्र गावभर लाजिरवाणे फिरत असत. या महारवाडयात माणसांची दैना झाली आहे. पोटात आग, चूल पेटवण्यास काही नाही. गावाचे रखवालदार, हुकमाचे ताबेदार, असे हे महार आहेत."[११] या कवितेमधून समाजामध्ये असलेला गरीब-श्रीमंत असा भेदभाव दिसून येतो. वर्णव्यवस्था दिसून येते. त्याचप्रमाणे 'नारखावाडयातील' असणाऱ्या गलिच्छ वस्तीचे वर्णन त्यांनी आपल्या कवितेमधून केले आहे. 'नारखावाडयातील' घाण ही आजसुध्दा समाजामधील वास्तवता आहे. आज समाज सुधारला आहे. सामाजिक, आर्थिक स्तरावर निरनिराळे प्रयोग केले जात आहेत. परंतु ग्रामीण भागातील समाज आजही मागासलेला आहे. त्यांनी समाजात असलेल्या

गलिच्छपणावर प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर दारिद्रय, अशिक्षितपणाचेही चित्रण त्यांनी आपल्या कवितेमधून केले आहे.

**सामाजिक लोकजागृती**

समाजव्यवस्थाच जेंव्हा भ्रष्ट होते त्यावेळी समाजामध्ये अंनागोंदी माजते. अशा अंदाधुंदी समाजव्यवस्थेवची त्यांना जाण होती. समाजव्यवस्था जर बिघडली तर मानवी जीवन उद्‌ध्वस्त होते. समाजातील प्रत्येक घटक हा एकमेकांवर अवलंबून असतो. प्रत्येकाने आपल्याला नेमून दिलेले काम केले नाही तर सामाजिक स्थिती पूर्णपणे कोलमडून जाते. त्याचेच चित्रण बहिणाबाईनी 'अनागोंदी कारभार' या कवितेत केले आहे. ''ही कविता अत्यंत मार्मिक आहे. माणसांच्या गलथान वृत्तीवर प्रकाश टाकणारी आहे. त्यांनी सांगितलेल्या गावात काही अजबच प्रकार नजरेस पडतो.[१२]

'' भुजे सोनार मडकं
कुंभारानं केले तोडे
बंडी शिवतो सुतार
शिंपी लाकडाले घडे''[१३]

कशाचाच कशाशी ताळमेळ नाही. कुंभार सोनाराचं काम करतो तर सोनार कुंभाराचे, शिंपी म्हणे सुतारकाम करतो तर सुतार बंडी शिवतो, चांभार विळा तयार करतो. ब्राम्हणाऐवजी महार पोथी वाचतो आणि मेलेली गुरं ओढून नेण्याचं काम ब्राम्हण करतो. अशी जर कामाची तऱ्हा असेल तर कामाचे काय होणार. अशी जर कामाची वाटणी झाली तर समाजव्यवस्था बिघडलेली कोणालाच काही कळणार नाही. ज्या गावचे सामाजिक जीवन अशा पध्दतीचे आहे त्या गावाला उध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही असेच त्यांनी सांगितले आहे. या कवितेमधून बहिणाबाई लोक जागृती करताना दिसून येतात.

## समारोप

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. फार पुरातन काळापासून तो समूह करून गटागटाने राहात आलेला आहे. समाजातील सर्वच घटक एकमेकावर अवलंबून असल्याने ते मिळून-मिसळून राहत असतात. पण कालांतराने एकमेकांमध्ये द्वेषभावना वाढीस लागली आणि समाजाचे विघटन होत गेले. बहिणाबाईंनी आपल्या कवितेत अशा विघटण होऊ घातलेल्या समाजाचे वास्तव चित्र रेखाटले आहे. आपापसातील भेदा-भेदावर त्यांनी टीका केली आहे. समाजातील लोकांना उपदेशही केलेले आहेत. त्यांच्या समाज निरीक्षणातून मानवाला जीवनाचे तत्त्वज्ञान लाभले आहे हे आपल्याला दिसून येते. त्यांनी माणसाला आयुष्याचा गहन अर्थ सांगितला आहे त्यांचं काव्य हे ग्रामीण जीवनाचं दर्शन घडविणारं काव्य आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेमध्ये शेती, शेतीला पूरक असणाऱ्या व्यवसायाचे चित्रण त्याचप्रमाणे त्या ठिकाणचा परिसर इ. चे चित्रण येते.

बहिणाबाईनी समाजामध्ये सुधारणा घडावी म्हणून समाजातील जातीभेदावर आर्थिक विषमतेवर प्रहार केला. त्याचबरोबर जीवनाचे तत्त्वज्ञान सोप्या भाषेत सांगण्याचाही प्रयत्न केला. त्यांनी समाजजीवनातील सुख-दुःखाचा शोध घेवून त्याचे चित्रण आपल्या कवितेमधे केले आहे. अशी त्यांची कविता अप्रत्यक्ष विज्ञाननिष्ठ आणि आधुनिक विचारांकडे झेपावणारी आंहे.

-----

## प्रकरण दुसरे

### संदर्भ

१. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स (प्रकाशक), आवृत्ती चौथी, १९८२, पृष्ठ क्र. ४१.

२. तत्रैव पृष्ठ क्र. २२

३. तत्रैव पृष्ठ क्र. १०२

४. तत्रैव पृष्ठ क्र. १२६

५. पोतदार अनुराधा, सहकंप, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रथमावृत्ती, १९८२, पृष्ठ क्र, १८४

६. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, प्रकाशन, ज्योती पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृष्ठ क्र, ५०

७. तत्रैव, पृष्ठ क्र. ५५

८. स.ग.यादव, निसर्गकन्या, बहिणाबाई चौधरी, प्रचार प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती पहिली १९८२, पृष्ठ क्र. ११७.

९. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी. प्रकाशन, ज्योती पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृष्ट क्र. ९२

१०. तत्रैव, पृष्ठ क्र. ६५

११. स.ग.यादव, निसर्गकन्या, बहिणाबाई चौधरी, प्रचार प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती पहिली १९८२, पृष्ठ क्र. ५७,५८.

१२. प्रमिला भिरूड, बहिणाईची गाणी, एक अभ्यास , व्यंकटेश प्रकाशन, जळगांव,प्रथमावृत्ती ४ ऑगस्ट २०००, पृष्ठ क्र. १५८

१३. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी , प्रकाशन ज्योती पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२ , पृष्ठ क्र, ७४.

-----

14366

A